विद्युत लोकपाल (मुंबई)
(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ६२ / २०२३

घरगुती श्रेणीतील नवीन वीज जोडणीकरीता झालेल्या विलंबासाठी नुकसानभरपाई मिळण्याबाबत

श्री. कपिल विठ्ठल सुर्वे .... अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, चिपळूण (महावितरण) .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- अनुपस्थित

प्रतिवादीतर्फे :- कैलाश पी. लवेकर, कार्यकारी अभियंता, चिपळूण

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २२ ऑगष्ट २०२३

आदेश पारित दिनांक :- ३१ ऑगष्ट २०२३

आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २७ एप्रिल २०२३ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २७ जून २०२३ रोजी दाखल केले.

२. मंचाने दिनांक २७ एप्रिल २०२३ रोजीच्या आदेशान्वये तक्रारदार यांचे गाऱ्हाणे (क्रमांक ८६/२०२२) बाबत खालीलप्रमाणे निर्देश दिले.

"१. तक्रारदार ग्राहकाचे गाऱ्हाणे खालीलप्रमाणे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकाला कोटेशन देण्यास झालेल्या विलंबाबाबत रु.५५०/- इतकी नुकसान भरपाई द्यावी.

३. वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकाला नवीन घरगुती वीज जोडणी देणेस झालेल्या विलंबाबाबत रु.७००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी.

४. वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकास वरील प्रमाणे द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम हा आदेश प्राप्त झालेनंतर २ महिन्याच्या आत तक्रारदार ग्राहकांच्या पुढील वीज देयकात समायोजीत करावी.

३. अपिलार्थीच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे व दिनांक २२ ऑगष्ट २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे महावितरणचे मुक्काम पोष्ट बोरगाव, चिपळूण, रत्नागिरी येथील दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ पासून घरगुती वीज ग्राहक (क्र.२१९७७०००५६३१) आहेत. अपिलार्थीने नवीन घरगुती वीज जोडणीसाठीचा अर्ज दिनांक ९ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रतिवादी महावितरणकडे केला. त्यानंतर प्रतिवादीने दिनांक १३ एप्रिल २०२२ रोजी रक्कम रु.३१७३/- चे कोटेशन दिले. अपिलार्थीने दिनांक २४ एप्रिल २०२२ रोजी सदर कोटेशनचा भरणा केला. दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी अपिलार्थीस वीज जोडणी देण्यात आली. अपिलार्थीने नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केल्यावर वेळेत कोटेशन न मिळाल्याने व वीज जोडणी मिळण्यास झालेल्या विलंबामुळे नियमानुसार नुकसान भरपाई मिळण्यासाठी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक २७ एप्रिल २०२३ रोजीच्या आदेशान्वये कोटेशन देण्यास झालेल्या विलंबाबाबत रु.५५०/- व वीज जोडणी देणस झालेल्या विलंबाबाबत रु.७००/- इतकी नुकसान भरपाई दिली.

- अपिलार्थीने नमुद केले की, प्रतिवादीनी कोटेशन देण्यास २२ आठवडयाचा विलंब केला असल्याने, माननीय आयोगाच्या नियमावलीनुसार कोटशनचा भरणा केल्यावर ३ महिन्यांनी वीज जोडणी दिली जाण्याची असलेली अनुमती या प्रकरणी लागू होत नाही. कोटेशन मिळण्यासाठी प्रतिवादीकडून झालेल्या विलंबास अपिलार्थीची कोणतीही चूक नाही. अपिलार्थीने दिनांक २४ एप्रिल २०२२ रोजी कोटेशनचा भरणा केला त्यानुसार वीज जोडणी दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी वीज जोडणी दिलेली असल्याने यासाठी केवळ १४ आठवडयांचाच विलंब झाला व त्यासाठी रु.५५०/- ची भरपाई देणे योग्य नाही. प्रत्यक्षात ती ९ जानेवारी २०२२ ही तारीख स्वीकारली जाणे न्यायोचीत आहे.

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

- निर्धारीत वेळेत वीज जोडणी देण्यासाठी निर्धारीत वेळेतच कोटेशन देणे अनिवार्य आहे. अपिलार्थीने कोटेशनचा भरणा करण्यास विलंब झाला तरच भरणा केलेल्या तारखेपासून पुढील तीन महिन्यात ही तरतूद योग्य आहे. अपिलार्थीने दिनांक २४ एप्रिल २०२२ रोजी कोटेशनचा भरणा केल्याने वीज जोडणी दिनांक २४ जुलै २०२२ रोजीपर्यंत मिळणे आवश्यक आहे व त्यानुसार विलंबाच्या कालावधीची गणणा करून रक्कम मंजूर करणे न्यायोचीत नाही. वीज जोडणीबाबतचा विलंबाचा कालावधी हा दिनांक ९ जानेवारी २०२२ पासून धरण्यात यावा ही विनंती. वीज जोडणी दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी देण्यात आली त्यामुळे, विलंबाचा कालावधी हा ४४ आठवडयाचा झाला आहे. मात्र मंचाने तो १४ आठवडयाचा धरून फक्त रक्कम रु.७००/- दिली. प्रत्यक्षात विलंबाचा कालावधी ४४ आठवडयाचा धरून रु.२२००/- चा मंजूर होऊन तसा आदेश देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

- अपिलार्थीने नमुद केले की, अशी भरपाई माननीय सर्वोच्च न्यायालयाची तसेच केंद्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग, दिल्ली यांनी सुध्दा पुर्ण मान्यता दिली आहे. माननीय आयोगाच्या विनियमात सुध्दा स्वतंत्र तशा शब्दाकनाची तरतूद नाही. विनियम २०.२० मधील ९.२ (ड) ची तरतूद पाहता अपिलार्थीला दिलेली तरतूद करून ग्राहकाला झालेला खर्च तसेच मानसिक त्रासाबाबत उचित दिलासा देण्यास मोकळीक दिलेली आहे, मात्र या बाबींकडे मंचाचे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे प्रतिवादीना बेकायदेशीर वागण्यास मुभा मिळालेली आहे, ती ग्राहकास अन्यायकारक आहे. सबब, अपिलार्थीस मनस्ताप सहन करून स्वखर्चाने तक्रारीचे निराकरण करून घ्यावे असा संदेश दिला.

- मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयाकडे तक्रार दाखल केली व खालीलप्रमाणे मागण्या केल्या.
    - अपिल अर्ज मंजूर करण्यात यावा.
    - वीज जोडणी देण्यात एकुण ४४ आठवडयाचा विलंब झालेला आहे असा ठराव करण्यात येऊन मंचाच्या आदेशात रक्कम रु.७००/- मंजूरीचा आदेश रद्द करून रु.२२००/- मंजूर केल्याचा आदेश देण्यात यावा ही विनंती.
    - गाऱ्हाण्याच्या सर्व प्रकारच्या खर्चापोटी रु.५००/- मंजूर व्हावेत.
    - प्रतिवादीने कृतीमानकांचे पालन केलेले नाही, तसेच, अपिलार्थीस दिलेली त्रासदायक वागणूक व मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणून रु.१००००/- मिळावे अथवा न्यायोचित वाटणारी रक्कम मंजूरीचा आदेश देण्यात यावा.
    - इतर न्यायोचित आदेश देण्यात यावेत.

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

४. प्रतिवादींच्या दिनांक १७ जुलै २०२३ रोजीच्या उत्तरातील प्रमुख मुद्दे व दिनांक २२ ऑगष्ट २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे महावितरणचे मुक्काम पोष्ट बोरगाव, चिपळूण, रत्नागिरी येथील घरगुती ग्राहक (क्र.२१९७७०००५६३१) आहेत. अपिलार्थी यांनी दिनांक ९ ऑक्टोबर २०२१ रोजी घरगुती वीज जोडणीसाठी महावितरण कार्यालयाकडे केलेला अर्ज दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थींनी ऑनलाईन पध्दतीने दिनांक २४ मे २०२२ रोजी रु.३१७३/- चा भरणा केला. सदर कनेक्शनसाठी आवश्यक असणारे १५ लघुदाब पोलचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

- एनएससी (New Service Connection) योजने मार्फत सन २०२१-२२ मध्ये नवीन वीज जोडणी देण्यासाठी लागणारा निधी शिल्लक नसल्यामुळे, निधी उपलब्ध करण्याकरीता डीपीडीसी (DPDC) योजनेअंतर्गत सदरचे अंदाजपत्रक वरिष्ठ कार्यालियास दिनांक १६ मार्च २०२२ रोजीच्या पत्र क्र.EE/CPL/T/850 अन्वये पाठविण्यात आले.

- सन २०२२-२३ साठी एनएससी योजनेसाठी दिनांक २२ जुलै २०२२ रोजी निधी मंजूर झाल्यानंतर सदरचे अंदाजपत्रक दिनांक २५ ऑगष्ट २०२२ च्या पत्र क्र.EE/CPLT/ARR-NON DDF/19 नुसार मंजूर करण्यात आले. सदरचे काम पूर्ण करून घेऊन अपिलार्थीस दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी वीज जोडणी दिली.

- प्रतिवादीने असे नमुद केले की, व सदर भागामध्ये पाऊस पडत असताना व प्रतिवादींची यंत्रणा वीज पुरवठा सुरळीत राखण्यासाठी युध्दपातळीवर काम करत असताना सुध्दा सुनावणीचे महत्व लक्षात घेऊन कार्यकारी अभियंता व्यक्तीशः सुनावणीसाठी उपस्थित आहेत. मात्र अपिलार्थी हे सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. त्यामुळे यंत्रणेचा व न्यायव्यवस्थेचा वेळ वाया गेल्याचे लक्षात येते, हि बाब विचारात घेतली जावी.

- अपिलार्थी कपिल विठ्ठल सुर्वे यांनी दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी पत्रान्वये (आवक क्र.३४८९ दिनांक ७ नोव्हेंबर २०२२) खालीलप्रमाणे कळविले आहे.

  "मी कपिल विठ्ठल सुर्वे आपणास कळवू ईच्छितो की, आपल्यात (मी.पालशेतकर साहेब, कदम साहेब) झालेल्या संभाषणा नुसार आपन आम्हाला विद्युत जोडणी करुण दिलेली आहे. तरी आज पासून माझी महावितरण विभागा कडे तक्रार अशी राहिली नाही.
  आपण दिलेल्या सहकार्याबाबत धन्यवाद.
  आभारी आहे."

विद्युत लोकपाल म.वि.नि.आ.

वस्तुतः अपिलार्थी ने स्वतःची स्वाक्षरी करुन लिहून दिले की, "महावितरण विभागाकडे कोणतीही तक्रार राहिली नाही". तरी सुध्दा अपिलार्थीचे प्रतिनीधी प्रतिवादींशी तुच्छतेने वागून, छोटया-छोटया गोष्टींचा विपर्यास करुन प्रकरण निकाली काढण्यात अडथळा आणतात. सबळ कारण नसताना गाऱ्हाणे तयार करण्यात आले आहे. अपिलार्थीचे प्रतिनिधी तक्रार / गाऱ्हाणे सोडविण्याऐवजी ते मांडण्यात अधिक उत्सुक आहेत. सबब, अपिलार्थीच्या प्रतिनिधींना याबाबत योग्य ती समज देण्यात यावी, ही विनंती.

- प्रतिवादीनी असे ही नमुद केले की, चिपळूण परीसरात अधिक प्रमाणात पाऊस पडत असून बऱ्याच वेळा तो मुसळधार पडतो. ऐन पावसाळयात ग्राहकांना अखंडीत आणि विश्वासार्ह वीज पुरवठा मिळावा म्हणून प्रतिवादी सर्व त्या वाजवी उपाययोजनांचा अवलंब करत असतात. हे करीत असताना बऱ्याच वेळा उपलब्ध मनुष्यबळ, सामुग्री इत्यादीबाबत कमतरता भासते. अपिलार्थी कपिल विठ्ठल सुर्वे यांच्याकडून श्री. आनंद शिवराम ओक यांनी मुखत्यारपत्र घेऊन "अनुसूची ब" वर ग्राहकाच्या सहीच्या ठिकाणी त्यांनी सही केली आहे. सर्वसाधारणपणे मुखत्यार पत्र हे सिव्हिल केसेसमध्ये वापरले जाते. जेव्हा अर्जदार हा तात्पुरत्या किंवा कायमचा आजारी किंवा अपंगत्व किंवा स्वाक्षरी करण्यास असमर्थ असेल. माननीय आयोगाने गाऱ्हाणे निवारण्याची कार्यपध्दती सुट-सुटीत केली आहे, जसे की, (ग्राहकाचे नाव व सही, ग्राहक प्रतिनिधी नामनिर्देशन व सही). तथापि ग्राहक प्रतिनिधी हे मुखत्यारपत्रधारक या नात्याने जाणिवपुर्वक शासकीय यंत्रणेचा वेळ व खर्च वाया घालवतात याची नोंद घ्यावी.

- मंचाने दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थींना माहे जून २०२३ च्या वीज देयकात रु.१२५०/- समायोजीत करुन मंचाच्या आदेशाचे पालन केले आहे. तसेच, अपिलार्थींनी अपील अर्जात मुळ तक्रारीपेक्षा कोणताही नवीन मुद्दा उपस्थित केलेला नाही.

- सदर वीज जोडणी देण्यासाठी प्रतिवादीने जाणूनबुजून कोणताही विलंब केलेला नाही. नवीन वीज जोडणीसाठी निधी उपलब्ध झालयाबरोबर अपिलार्थीस लगेचच नवीन वीज जोडणी देण्यात आली. त्यामुळे, अपिलार्थीने केलेली नुकसान भरपाईची मागणी फेटाळून लावण्यात यावी व वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

५. अपिलार्थीने दिनांक २७ जुलै २०२३ रोजी केलेल्या ईमेलद्वारे त्यांचे अभिवेदनावरील प्रतिवादींच्या उत्तरावरील प्रतिसादात्मक म्हणणे मांडले आहे.

विद्युत लोकपाल
म.वि.नि.आ.

- अपिलार्थीने नमुद केले की, अपिलार्थीने त्यांचा दिनांक ९ ऑक्टोबर २०२१ रोजी ऑनलाईन अर्ज दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी प्राप्त झाल्याचे केलेले कथन दिशाभुल करणारे असुन, ते महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०२१ (कृतीची मानके विनियम २०२१) मधील विनियम ५.७ (बी) च्या तरतुदीनुसार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे. ऑनलाईन पध्दतीन कोटेशन रक्कमेचा भरणा दिनांक २४ एप्रिल २०२२ रोजी केला, पण प्रतिवादीने त्याची दिनांक २४ मे २०२२ रोजी नोंद घेतली, हे त्याचे कृत्य खोडसाळपणाचे आहे. कोटेशनचा भरणा वेळेत करण्यात अपिलार्थीकडून कोणतीही कसूर झालेली नाही.

- सदर वीज जोडणीसाठी १५ वीज खांबाचे (पोलचे) अंदाजपत्रक तयार करण्यात आल्याचे प्रतिवादीचे कथन हा त्यांच्या कामकाजाचा भाग आहे, त्याचा ग्राहकाशी काहीही संबध नाही. त्याबाबत, प्रतिवादींना काही सुट मिळेल, अशी विनियमात काहीही तरतूद नाही, त्यामुळे त्यांचे हे कथन बेदखल करण्यात यावे. प्रतिवादीनी निधिची कमतरता असल्याचे कथन केले आहे, यास विनियमात सहाय्यभूत होईल अशी कोणतीही तरतूद नाही. अंदाजपत्रके बनविने, त्यास मंजूरी प्राप्त करणे इत्यादी कामे त्यांची अंर्तगत बाब आहे व त्यावर उपाय योजना करण्याचे निर्देश माननीय आयोगाच्या एका आदेशात आहे.

- निधी उपलब्ध झाल्यावर दिनांक २५ ऑगष्ट २०२२ रोजी अर्जाच्या सादरीकरणानंतर १० महिन्याच्या कालावधीने अंदाजपत्रक तयार करण्यात आले हे कथन कृती मानके विनियम २०२१ मधील विनियम ५.८(बी) च्या तरतूदीनुसार असमर्थनीय आहे. मंचाच्या आदेशाचे पालन केले आहे, हे, प्रतिवादीचे म्हणने कौतुकास्पद नाही. ते करणे त्यांचे कर्तव्यच आहे; अन्यथा, प्रतिवादीस आयोगाने केलेल्या विनियमातील कठोर तरतुदींचा सामना करावा लागेल.

- अपिलार्थीने मुळ अभिवेदनात नमुद केलेल्या मागण्या पुन्हा त्यांनी दाखल केलेल्या प्रतिसादात्कम पत्रात केलेल्या आहेत.

६. अपिलार्थीने दिनांक १६ ऑगष्ट २०२३ रोजी केलेल्या ईमेल ने ई-सुनावणीसाठी आवश्यक असणारी यंत्रणा उपलब्ध नसल्याने सुनावणीस हजर राहू शकणार नाही. उपलब्ध कागदपत्राच्या व अभिवेदनात नमुद केलेले मुद्दे याच्या गुणवत्तेवर योग्य तो निर्णय दयावा अशी विनंती केली.

विश्लेषण व निर्णय

७. अपिलार्थी हे महावितरणचे घरगुती वीज ग्राहक आहेत. अपिलार्थीने नवीन घरगुती वीज जोडणीसाठीचा अर्ज दिनांक ९ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रतिवादी महावितरणकडे केला. त्यानंतर प्रतिवादीने, अपिलार्थीस नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केल्यावर वेळेत कोटेशन न मिळाल्याने व वीज जोडणी मिळण्यास झालेल्या विलंबामुळे कृती मानके विनियम २०२१ नुसार नुकसान भरपाई मिळण्यासाठी मंचाकडे तक्रार दाखल केली. अपिलार्थीने दिनांक २४ एप्रिल २०२२ रोजी कोटेशनचा भरणा केल्याने वीज जोडणी दिनांक २४ जुलै २०२२ रोजीपर्यंत मिळणे आवश्यक आहे व त्यानुसार विलंबाच्या कालावधीची गणना करून रक्कम मंजूर करणे, न्यायोचीत नाही. वीज जोडणीबाबतचा विलंबाचा कालावधी हा दिनांक ९ जानेवारी २०२२ पासून धरण्यात यावा ही विनंती. वीज जोडणी दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी देण्यात आली त्यामुळे, विलंबाचा कालावधी हा ४४ आठवडयाचा झाला आहे. मात्र मंचाने तो १४ आठवडयाचा धरून फक्त रक्कम रु.७००/- दिली. प्रत्यक्षात विलंबाचा कालावधी ४४ आठवडयाचा धरून भरपाई रक्कम रु.२२००/- चा मंजूरी आदेश देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

८. अपिलार्थी यांनी दिनांक ९ ऑक्टोबर २०२१ रोजी घरगुती वीज जोडणीसाठी महावितरण कार्यालयाकडे केलेला अर्ज दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीनी ऑनलाईन पध्दतीने दिनांक २४ मे २०२२ रोजी रु.३१७३/- चा भरणा केला. सदर कनेक्शनसाठी आवश्यक असणारे १५ लघुदाब पोलचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. अपिलार्थीस एनएससी (New Service Connection) योजनेअंर्तगत नवीन वीज जोडणी देण्यासाठी २०२१-२२ वित्तीय वर्षात लागणारा निधी शिल्लक नसल्यामुळे, वीज जोडणी देण्यास विलंब झाला. निधी उपलब्ध व्हावा यासाठी पाठपुरावा केल्यावर, निधी मंजूर झाल्यावर दिनांक २५ ऑगष्ट २०२२ रोजी अपिलार्थीचे अंदाजपत्रक मंजूर करून ठेकेदाराकडून वीज जोडणीसाठी लागणारे काम पूर्ण करून घेऊन अपिलार्थीस दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी वीज जोडणी दिली. मंचाने दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थींना कोटेशन देण्यात झालेल्या विलंबाबाबत रु.५५०/- व नवीन घरगुती वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबाबत रु.७००/- असे एकुण रु.१२५०/- माहे जून २०२३ च्या वीज देयकात समायोजीत करून मंचाच्या आदेशाचे पालन केले आहे.

९. अपिलार्थीने वीजे अभावी नुकसान झाल्याचे नमूद केले आहे. मात्र अप्रत्यक्ष नुकसान भरून देण्याची कोणतीही तरतूद (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०20) विनियमात नाही. या संदर्भात विनियम क्र.२०.४ (इ) ची तरतूद लक्षात घेणे गरजेचे आहे, ती खालील प्रमाणेः

विद्युत लोकपाल ... म.वि.नि.आ.

"२०.४ (इ) ग्राहकाने सहन केलेल्या कोणत्याही तोटा किंवा नुकसानीकरीता तो (विद्युत लोकपाल) निवाडा देईल ती रक्कम भरपाई म्हणून तक्रारदाराला अदा करण्याचा निर्देश; आणि / किंवा

परंतू तथापि असे की, ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी, अप्रत्यक्ष, परिणामस्वरुप, आनुषंगिक, दंडात्मक किवा दहशती नुकसान, संधी अथवा लाभाचे नुकसान यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही; "

१०. ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम ८.१० अन्वये खालीलप्रमाणे.

"तक्रारदार, वितरण परवानाधारक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती मंचासमोर असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत पक्षकार असेल तर ती मंचापुढे व्यक्तिशः उपस्थित राहील किंवा अधिवक्ता (अधिवक्ता अधिनियम १९६१ मधील अर्थानुसार) वगळून कोणत्याही प्रतिनिधीस, मंचासमोर त्याचे प्रकरण मांडण्यासाठी किंवा या प्रयोजनासाठी लागणारे कोणतेही किंवा इतर सर्व कामे करण्यासाठी, अश्या प्रतिनिधीच्या नावे पक्षकाराने यथायोग्य प्राधिकृत केलेले प्राधिकारपत्र देण्याचा अधीन राहून, प्राधिकृत करील आणि तो खालील अटीच्या अधीन राहील -

ए. तो प्रत्येक प्रकरण-निहाय बाजू मांडेल.

बी. त्याचे तक्रारदाराशी पुर्वीपासून अस्तित्वात असलेले संबंध (जसे की, नातेवाईक, शेजारी, व्यवसाय सहयोगी किंवा वैयक्तिक मित्र).

सी. त्यास मंचासमोर उपस्थित राहण्यासाठी कोणत्याही प्रकारे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पारिश्रमिक मिळत नाही आणि त्या संबधीत लेखी प्रतिज्ञापत्र दाखल करील.

डी. पक्षकाराचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी तो समर्थ असल्याचे मंचासमोर पटवून देईल."

तथापि, या केस मध्ये ग्राहक प्रतिनिधी हे मुखत्यार पत्र घेऊन अनुसुची 'ब' मध्ये ग्राहक म्हणून सही करतात, असे निदर्शनास येते.

११. मंचाने आपल्या आदेशात खालीलप्रमाणे नोंद केली आहे ती खालीलप्रमाणे :-

"ग्राहकाचा वीज मागणी अर्ज दि. ०९.१०.२०२१ चा आहे. वि.प. विद्युत वितरण कंपनीकडून तक्रारदार ग्राहकाला कोटेशन देणेस विनियमानुसार २२ आठवडयाचा विलंब झाला आहे. त्याबाबत प्रति आठवडयास रु.२५/- प्रमाणे वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकाला नुकसान भरपाई देणे जरुर आहे. सबब वितरण कंपनीने ग्राहकांला कोटेशन देण्यास लावलेल्या २२ आठवडयाचा विलंबाबाबत सदर ग्राहकाला रक्कम रु.५५०/- इतकी नुकसान भरपाई धावी. तसेच ग्राहकाला नवीन वीज जोडणी दि.०६.११.२०२२ रोजी देण्यात आली आहे. कृतीच्या मानकांची पुर्तता न केल्यामुळे ग्राहकांना धावयाचा भरपाई बाबतच्या जोडपत्र-२ मध्ये परिपुर्ण अर्ज प्राप्त झालेल्या तारखेपासून आणि आकाराचा भरणा केल्यानंतर वीज पुरवठा करावयाचा कालावधी वितरण मेन्स विस्तार वाढ करावयाची असल्यास तीन महिन्याचा आहे. प्रस्तुत कामी ग्राहकाने कोटेशननुसार

रक्कम रु.३१७३/- दि.२४.०४.२०२२ रोजी भरले आहेत. प्रस्तुत कामी ग्राहकाला वीज जोडणी देण्यासाठी १५ पोलची उभारणी वीज तारासह करावी लागत आहे. त्यामुळे याकामी ग्राहकाला वीज पुरवठा करणेसाठी वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करावा लागला आहे. त्यामुळे या कामी ग्राहकाला विद्युत पुरवठा करावयाचा कालावधी दि. २४.०४.२०२२ पासून तीन महिन्यापर्यन्त आहे. म्हणजे दिनांक २४.०७.२०२२ पर्यंत आहे. विनियमातील तरतुदीनुसार वि.प.विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकाला घरगुती वीज जोडणी देण्यास कोटेशनची रक्कम भरलेनंतर १४ आठवडयाचा विलंब झाला आहे. प्रति आठवडयाच्या विलंबासाठी रु.५०/- नुसार भरपाई ग्राहकाला देणे जरुर आहे, सबब १४ आठवडयाच्या वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबाबत वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकाला रक्कम रु.७००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी, या निष्कर्षास हा मंच आला आहे."

१२. सदर अभिवेनाबाबत सर्व बाबींचा उहापोह करुन मंचाने, योग्य तो निर्णय दिला आहे. अनुसूची 'ब' वर ग्राहकांच्या सही करण्याच्या जागी, मुखत्यार पत्र घेऊन सही करणे योग्य नाही. मंचाने आदेश योग्य दिला असताना त्यावर असमाधान व्यक्त करुन, मुखत्यारपत्रधारक या नात्याने नवीन गाऱ्हाणे तयार करुन ते दाखल केले. त्यामुळे शुल्लक कारणासाठी शासकीय यंत्रणेचा बहुमुल्य वेळ वाया घालविला याबाबत हे न्यायालय खेद व्यक्त करीत आहे.

१३. अपिलार्थींच्या अपिल अभिवेदनातील मागण्या फेटाळण्यात येत आहेत.

१४. अपिलार्थींचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

Certified to be a true copy
Shri D. S. Dumbre
Secretary
म.वि.नि.आ.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)